सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

E-Mail- homebranchpune@gmail.com

दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१

वाचा :-

१) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ कलम ३४ मधील पोटकलम (सी) व (एम)

३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक कोरोना/२०२०/प्रक्रं.५८/आरोग्य -५ दि.१३.०३.२०२०, दि.१४.०३.२०२० तसेच दि.१५.०३.२०२० रोजीची अधिसुचना

४) महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांचेकडील क्रं.४०-३/२०२० - दि.२४.०३.२०२०

५) या कार्यालयाकडील जा.क्रं.जि.आ.व्य/कोरोना विषाणू/कावि/२४६/२०२० दि.३०.०३.२०२० रोजीचा आदेश

*******************************************************************

क्र.कक्ष/कोरोना विषाणू /398/२०२०

पुणे, दिनांक १० /०४/२०२०

**विषय :- कोरोना विषाणुचा ( कोव्हीड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत.**

**आदेश**

**ज्या अर्थी**, राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २,३,४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे

**ज्या अर्थी** पुणे जिल्हयातील कोरोना विषाणुचा वाढता संसर्ग रोखण्यासाठी वाचले क्रं.५ अन्वये फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये पाच किंवा पाच पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करणेत आली आहे. ती जिल्ह्यातील विविध राष्ट्रीयकृत बँकामध्ये प्रधान गरीब कल्याण योजनेतील पात्र लाभार्थी हे पैसे काढण्यासाठी मोठया प्रमाणावर लोक एकत्र येवुन गर्दी होत आहे असे माझे निदर्शनास आले आहे.

**त्या अर्थी मी नवल किशोर राम, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, पुणे जिल्ह्यात** आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ वाचले क्रं.१ ते ४ नुसार मला प्रदान केले अधिकाराचा वापर करुन या आदेशाद्वारे खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) जिल्हयातील सर्व बँकांनी प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेतील पात्र लाभार्थ्यांची गाव निहाय यादी जिल्हा आग्रणी बँकेकडे त्वरीत सादर करावी.जिल्हा आग्रणी बँकेने सदरची यादी एकत्र करुन पोस्ट ऑफीसकडे जमा कराव्यात.

२) पोस्ट ऑफीस इंडिया पोस्ट बँकेच्या माध्यमातुन लाभार्थ्यांना त्यांचे घरी जाऊन सदरची रक्कम अदा करावी.

३) वरील प्रमाणे लाभार्थ्यांना रक्कम देणेची कार्यवाही पोस्ट ऑफीस तसेच नेहमीप्रमाणे बँकांद्वारे करणेत येईल.

४) वरीलप्रमाणे कार्यवाही करीत असताना वाचले क्रं.५ अन्वये पारीत करणेत आलेल्या बंदी आदेशाचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबधिताविरुदध आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ अन्वये तसेच भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करणेत येईल.

सदरचा आदेश माझ्या सहिशिक्यानिशी दिला असे. आज दि.१०.०४.२०२०

जिल्हाधिकारी पुणे

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे**

**प्रति:-** १. जिल्हा समन्वय पुणे जिल्हयातील सर्व बँका पुणे

२.सिनियर पोस्ट मास्टर जनरल पोस्ट ऑफीस पुणे

**प्रत :-** १. व्यवस्थापक जिल्हा आग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया पुणे

२/- आपले अधिनस्त सर्व बँका, पोस्ट ऑफीस कार्यालयांना सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करणेबाबत आपले स्तरावरुन सुचना देणेत याव्यात.

२.जिल्हा माहिती अधिकारी पुणे

२/- सदरचा आदेश स्थानिक वृत्तपत्रामध्ये बातमी स्वरुपात प्रसिदध करणे यावा.

Scanned by CamScanner